भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA U 831899

राजेश शर्मा
मुद्रांक विक्रेता
कोर्ट अम..ला.न.4/86

14 OCT 2016

# करारनामा

हा करारनामा अमरावती येथे आज दि. ०१ /०४ /२०१६ रोजी खालीलप्रमाणे पार्टी नं.१ व पार्टी नं. २ यांच्या मध्ये करण्यात आलेला आहे.

पार्टी नं. १ : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ तर्फे
कुल सचिव, संत गाडगे बाबा अमरावती.

पार्टी नं. २ : जगदीश कन्हैय्यालाल श्रीवास, अध्यक्ष, युवा प्रहार स्वयं रोजगार नागरिक सेवा सहकारी संस्था मर्या. अमरावती.
वय ४८ वर्षे, धंदा – बेरोजगार, रा. जुनी हिंदी शाळा नं. २ चे मागे, मधुबन चौक, मसानगंज, अमरावती.

ज्याअर्थी विद्यापीठातील वाहनांवर मान्यताप्राप्त पंजीकृत मनुष्यबळ पुरविण्याऱ्या सेवाभावी संस्थाकडून मानधनावर कंत्राटी वाहन चालकाची, कंत्राटी पध्दतीने सेवा घ्यावयाची आहे.

आणि

अध्यक्ष
युवा प्रहार स्वयंरो.ना.से.सह.संस्था

ज्याअर्थी निविदेसोबतचे जोडपत्रातील कंत्राटी वाहनचालकाच्या कंत्राटी पध्दतीने सेवा घेणे बाबतच्या नमूद केलेल्या अटी व शर्ती अस्तित्वात आहेत.

आणि

ज्याअर्थी विद्यापीठाने त्याच्या कार्यालयीन आदेश क्र. संगाबाअवि/1/322/IV-556/2016, दि.10/03/२०१६ नुसार विद्यापीठातील वाहनांवर मान्यताप्राप्त पंजीकृत मनुष्यबळ पुरविणाऱ्या सेवाभावी संस्थाकडून मानधनावर कंत्राटी वाहन चालकाची, कंत्राटी पध्दतीने सेवा घेणेसंदर्भात पार्टी नं. २ चा निविदा अर्ज स्वीकृत केलेला आहे.

आणि

ज्याअर्थी, कंत्राट पार्टी नं. २ ला देण्यात आलेला आहे.

आणि

ज्याअर्थी, कंत्राटदाराने मानधनावर कंत्राटी वाहन चालकांची, कंत्राटी पध्दतीने सेवा घेणेसंदर्भात करार करण्याचे मान्य केले आहे.

आणि

ज्याअर्थी, कंताटदाराने सुरक्षा ठेव रू ५% रु. 32,000/-/-(अक्षरी रु. बत्तीस हजार रुपये ........... फक्त) विद्यापीठ खाती जमा केलेले आहे.

ज्याअर्थी,पार्टी नं. १ व पार्टी नं. २ निविदेसोबतच्या अटी व शर्तीनुसार नमुद कंत्राट रकमेनुसार कंत्राटी वाहन चालक पूरविण्याबाबत करारनामा लिहून देत आहे.

१) कंत्राटाचा कालावधी – कराराच्या तारखेपासून दोन वर्षाकरीता दि.31/03/ २०१8 पर्यंत राहील.

२) कंत्राटदाराने त्यास प्राप्त झालेल्या नियुक्तीपत्रातील सर्व अटी व शर्ती वाचल्या आहेत आणि त्या त्यांना / कंत्राटदाराला समजल्या आहेत. त्या सर्व अटी व शर्ती कंत्राटदाराला मान्य आहेत.

३) जर कंत्राटदाराकडून एखाद्या अंटी/ शर्तीचे अंशत: अथवा पूर्णत: उल्लंघन/ भंग होत असल्याचे निदर्शनास आल्यास, असा कंत्राट १ महिन्याची पूर्व नोटीस देवून करारनामा रद्द करण्याचा अधिकार विद्यापीठाला राहील. अशा परिस्थितीत कंत्राटदार संस्थेची जमा असलेली सुरक्षा रक्कम इ. जप्त करण्यात येईल. याची कंत्राटदाराला जाणीव आहे.

४) कंत्राटदाराने, यासंदर्भातील सर्व माहिती जाणून घेतल्यानंतर जाणीवपूर्वक व स्वच्छेने सदर कंत्राटी काम स्वीकारत आहे.

५) या कंत्राटी कामानंतर कंत्राटदाराला वा त्याच्या संस्थेला कायम स्वरूपी काम मिळण्याचा हक्कराहणार नाही. तसेच या करारनाम्याच्या कालावधीनंतर विद्यापीठावर कोणतीही जबाबदारी राहणार नाही व या कंत्राट सेवेशी निगडीत कोणत्याही प्रकारची मागणी कंत्राटदार वा त्याची संस्था करणार नाही, अशी या करारनाम्याद्वारे हमी देत आहे.

६) पार्टी नं. २ (कंत्राटदार) रूपये १००/– (अक्षरी रूपये शंभर फक्त ) चे स्टँमपेपर वर पार्टी नं. १ ला प्रतिज्ञालेख करून देण्याची हमी देतो.

अध्यक्ष
युवा प्रहार स्वयंरो.ना.से.सह.संस्था

७) कंत्राटाचे कालावधीचे दरम्यान कोणत्याही पध्दतीची अडचण निर्माण झाल्यास त्यावर मा. कुलगुरूनी दिलेला निर्णय हा अंतिम समजण्यात येईल.

८) या नियमामध्ये निर्माण होणारे सर्व लवाद हे न्यायीक व सलोखा कायदा (Arbitration and Conciliation Act) च्या तरतुदीअंतर्गत निकाली काढले जातील व सर्व प्रकारच्या विवादाचे निराकरण मा. अमरावती न्यायालयाचे कक्षेअंतर्गत राहील.

९) कंत्राटदाराचे कामकाज असमाधानकारक आढळून आल्यास त्याची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल. याबद्दल कंत्राटदाराची कुठलीही तक्रार राहणार नाही.

१०) कंत्राटदाराचे पुरविलेल्या कंत्राटी वाहनचालकाची सेवा-२४ तासाकरीता अधिग्रहीत केलेली असेल. आवश्यकतेनुसार कामाच्या वेळा कार्यालयाने ठरवून दिल्याप्रमाणे राहील.

११) पार्टी नं. १ (कंत्राटदार) यांनी सोबत जोडलेल्या अटी व शर्तीचे पालन न केल्यास अथवा त्याचे पालन करण्यास ते असमर्थ असल्यास कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही करण्याचे अधिकारी पार्टी नं. १ यांनी राखून ठेवलेले आहेत.

पार्टी नं. १ व पार्टी नं. २ ह्यांनी या करारनाम्यातील सर्व परिच्छेद आणि निविदेसोबतच्या अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचून व समजून घेऊन करार मान्य केल्याबाबत करारनाम्यावर स्वाक्षरी करीत आहोत.

अमरावती.

दिनांक : ०१/०८/२०१६

कुलसचिव

पार्टी नं. १

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

अध्यक्ष

युवा प्रहार स्वयंरो.ना.से.सह.संस्था

कंत्राटदार

पार्टी नं. २

अध्यक्ष

युवा प्रहार स्वयंरो.ना.से.सह.संस्था

साक्षीदार

१) राजेश भाऊराव पोरे

२) अंजनाबाई ...

३) ग.वि. पंचवटे

**Prepared by** **Verified by** **Approved by M.C.**

Vide Item No. 195

Dated : 30/08/2015

अध्यक्ष
युवा प्रहार स्वयंरो.ना.से.सह.संस्था

# कंत्राटी वाहनचालक कंत्राटासंबंधी अटी व शर्ती

१) निविदा धारकांनी निविदा अर्जासोबत रजिस्ट्रेशन (नोंदणी), आस्थापना नोंदणी अनुभव प्रमाणपत्र (मागील३ वर्षाचे) आयकर प्रमाणपत्र (मागील ३ वर्षाचे) व्यवसायकर इत्यादी प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती सादर कराव्यात.

२) कंत्राटदाराने उपलब्ध करून दिलेल्या वाहनचालकांची यादी, बाहनचालांचे ड्रायवींग लायसन्स, वाहन चालकांचा रहिवासी पुरावा म्हणून आधार कार्ड, निवडणुक कार्ड, इलेक्ट्रीक बील इत्यादी तसेच शैक्षणिक दाखला. जन्मतारखेचा दाखला, वाहनचालविण्याचे अनुभव प्रमाणपत्र Character Certificate इत्यादी कागदपत्रे जोडण्यात यावीत.

३) निविदेसोबत अनामत रक्कम (EMD) एकूण कंत्राट रकमेच्या २% राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी. च्या स्वरूपात कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचे नावाने काढून जोडण्यात यावा.

४) निविदा मंजूर झाल्यावर, कंत्राटदाराला करार करतांना वाहनाचे नुकसान तथा जीवित हानी प्रकरणी सुरक्षा ठेव म्हणून एकुण कंत्राट/कराराचे रकमेच्या ५% रक्कम विद्यापीठ खाती जमा करावी लागेल. त्यावर त्यांना कोणतीही व्याजाची मागणी करता येणार नाही. कंत्राट संपल्यावर वसुली योग्य रक्कम कपात करून उर्वरीत रक्कम परत करण्यात येईल. वसुलीची रक्कम जास्त असल्यास कंत्राटदार संस्थेला रोखीने भरणा करावा लागेल.

५) निविदा स्वीकारल्यानंतरकामाचे आदेश मिळाल्यापासून सात दिवसाचे आत वाहनचालकांना विहीत केलेला गणवेश (पांढरा किंवा खाकी फुलपॅन्ट व शर्ट), ओळखपत्र व नेमप्लेटसह प्रत्यक्ष कामाला सुरूवात करावी लागेल. अन्यथा निविदा रद्द करून सुरक्षा रक्कम जप्त करण्यात येईल.

६) कंत्राटी वाहनचालकांना शासन निर्णयाप्रमाणे मजुरीचे शोधन विहित मुदतीत करण्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील. या संबंधीच्या विधिवत तरतुदी अंतर्गत कोणतीही कायदेशरि अडचण उद्‌भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील. याबाबतच्या कोणत्याही बेकायदेशीर बाबींना विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

७) संहा. कामगार आयुक्त, कामगार विभाग, अमरावती यांचे नियंत्रणाअंतर्गत देय असलेल्या सर्व बाबीचे शोधन जसे ESIC (कर्मचारी राज्य विमा योजना), EPF (भविष्य निर्वाह निधी)इत्यादी स्वत: कंत्राटदारालाच करावे लागेल. विद्यापीठ या वि'ष;यही कोणतीही जबाबदारी स्वीकारणार नाही. सदर रक्कम संबंधित विभागाला जमा केल्याबाबतची चलानची

अध्यक्ष
युवा प्रहार स्वयंरो.ना.से.सह.संस्था

अध्यक्ष
भवा प्रहार स्वयंरो.ना.से.सह.संस्था

प्रमाणित छायाकीत प्रत दर महिन्याला सामान्य प्रशासन विभागात जमा करावी लागेल. तसेच विद्यापीठात जे कंत्राटी वाहनचालक कामावर राहतील त्याचे शोधन नियमानुसार केल्याचे देयक कंत्राटी वाहनचालकांच्या स्वाक्षरीसह पुराव्यादाखल दर महिन्याला सादर करावे लागेल. त्याची तपासणी केल्यानंतरच पुढील महिन्याचे वेतन देयक अदा करण्यात येईल.

८) कंत्राटदाराकडून दर महिन्याला प्राप्त होणाऱ्या देयकाच्या रकमेतून नियमानुसार आयकर, सर्व्हीस टॅक्स व नियमानुसार देय असलेले कायदेशिर कर इत्यादीची कपात विद्यापीठाद्वारे करण्यात येईल. त्याबद्दल कंत्राटदाराची कोणतीही उजर / तक्रार राहणार नाही.

९) कोणत्याही अटींचा अशत: अथवा पूर्णत: उल्लंघन/भंग होत असल्याचे निर्दशनास आल्यास, असा कंत्राट १महिन्याची पूर्वनोटीस देवून बंद करण्याचा अधिकारी विद्यापीठाला राहील. अशा परिस्थितीत कंत्राटदार संस्थेची जमा असलेली सुरक्षा रक्कम इ. जप्त करण्यात येईल. तसेच कंत्राटदाराने नमूद केलेल्या कारणास्तव एक महिन्याची आगावू सूचना दिल्यावर व कुलसचिव यांनी मान्यता प्रदान केल्यावरच कंत्राट समाप्त करता येवू शकेल.

१०) कंत्राटदाराने अस्तित्वात असलेला कामगार कायदा, मजूरी कायदा, Contract Labour Act (Regulation & Abolition Act)1970, नियम तसेच विनियमातील तरतुदीचे पालन करणे आवश्यक आहे. कंत्राटी वाहन चालकांच्या कोणत्याही दाव्यांसाठी विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. ह्यांची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

११) कामाच्या वेळेस कंत्राटदाराचे कंत्राटी वाहनचालकाला कोणत्याही प्रकारचा अपघात झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील. श्रमिक क्षतिपूर्ती कायद्यान्वये किंवा इतर कोणत्याही कायदद्यान्वये कंत्राटी वाहनचालकाला देय नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१२) विद्यापीठ आणि कंत्राटदाराने लांबलेल्या कंत्राटी वाहनचालकांमध्ये कोणताही नोकर मालक संबंध राहणार नाही व कंत्राटदाराने लावलेल्या कोणत्याही कंत्राटी वाहनचालकाला विद्यापीठाच्या विरूध्द कोणत्याही पदावर किंवा नोकरी मागण्याचा वा तत्सम दावा करण्याचा अधिकार राहणार नाही. त्या कंत्राटी वाहनचालकाकरीता कंत्राटदार ह्यांची मालक म्हणून सर्वस्वी जबाबदारी राहील.

१३) कंत्राटी वाहनचालक मद्यपान करणारा, गैरवर्तणूक करणारा अथवा बेजबाबदार असल्यास किंवा तो दीर्घ रजेवर असल्यास, काम सोडून गेल्यास त्याच्या बदली दुसरा कंत्राटी

अध्यक्ष
भवा प्रहार स्वयंरो.ना.से.सह.संस्था

अध्यक्ष
युवा प्रहार स्वयंरो.ना.से.सह.संस्था



वाहनचालक लावण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. त्याची पूर्वसूचना विद्यापीठाला द्यावी लागेल.

१४) निविदेमध्ये नमुद दराव्यतिरिक्त कोणतीही रक्कम विद्यापीठाद्वारे कंत्राटदारास देय राहणार नाही.

१५) तातडीचे / महत्वाचे कारणास्तव जरूर पडल्यास अथवा सूचना दिल्यावर सुटीचे दिवशी आणि रविवारी सुध्दा कंत्राटी वाहनचालकास काम करावे लागेल.

१६) विद्यापीठाकडून फक्त आपले संस्थेशी करार केल्या जाईल. वाहनचालकाशी कोणताही करार करण्यात येणार नाही. वाहनचालक कोर्टात गेल्यास विद्यापीठाला प्रतिवादी करता येणार नाही.

१७) कंत्राटी वाहनचालकाची सेवा ही २४ तासाकरीता अधिग्रहीत केलेली असेल. कामाच्या वेळा कार्यालयाने ठरवून दिल्याप्रमाणे राहील.

१८) कंत्राटी वाहनचालकाची वैद्यकीय तपासणी / तांत्रिक तपासणी करून घेण्याची व गुन्हेगारी वृत्तीची तपासणी करून गुन्हेगारी पार्श्वभूमीनसलेल्या वाहनचालकाला लावण्यची जबाबदारी संस्थेची राहील. वाहनचालक हा वैद्यकीयदृष्टया पात्र असावा. सदर वाहनचालकाचा विमा काढण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१९) कंत्राटदार संस्थेने कंत्राटाच्या सुरवातीलाच वाहनचालकांना गणवेश ओळखपत्र व नेमप्लेट पुरविणे व वाहनचालकाने ते परिधान करणे बंधनकारक राहील.

२०) वाहनाचा अपघात झाल्यास तसेच वित्त व प्राणहानी झाल्यास संपुर्ण जबाबदारी कंत्राटी संस्थेची राहील त्यामुळे नुकसान भरपाई कंत्राटदार संस्थेने करणे बंधनकारक राहील.

२१) कंत्राटी वाहनचालकाने नियमानुसार लांगबुक नियमित भरणे आणि प्रत्येक नोंदीवर संबंधित सक्षम अधिकारी/कर्मचारी यांची स्वाक्षरी वेळचेवेळी घेणे बंधनकारक राहील. तसेच दरमहिन्याला नियंत्रण अधिकारी यांचेकडून लॉंगबुक तपासून घेणे आवश्यक राहील.

२२) वाहनाची सर्व्हीसींग, प्रतिबंधात्मक देखभाल व दुरूस्तीबाबत प्रशासन वीिागाची पूर्वमंजूरात घेऊन भांडार विभागाद्वारे दुरूस्ती करावी लागेल. विद्यापीठाच्या मालकीचे वाहन कंत्राटी वाहन चालकास उपलब्ध करून देण्यात येईल.

२३) कंत्राटी वाहनचालकास महत्तम मासिक मजुरी रू. १४,०००/- देय राहील. त्यापेक्षा जास्त दराची निविदा स्वीकृत होणार नाही.

२४) वाहनाची अकस्मात तपासणी प्रशासन विभागातील संबंधित अधिकारी करू शकतील. त्यावेळी वाहनात प्रवासी आढळल्यास, लॉंगबुक अपुर्ण असल्यास व मुळे वाहनचालकाचे

अध्यक्ष
युवा प्रहार स्वयंरो.ना.से.सह.संस्था

अध्यक्ष
 युवा प्रहार स्वयंरो.ना.से.सह.संस्था

जागी दुसरा वाहनचालक आढळल्यास कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल.

२५) सदर्हू कंत्राट दोन वर्ष कालावधीसाठी राहील, तथापि कंत्राट विहित मुदतीनंतर दोन्ही पक्षाच्या परस्पर संमतीने नवीन कंत्राटदाराच्या नियुक्तीपर्यंत चालू राहील.

२६) कंत्राटाच्या कालावधीचे दरम्यान कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास त्यावर मा.कुलगुरूनी दिलेला निर्णय अंतिम समजण्यात येईल. तसेच वैधानिक अडचणी निर्माण झाल्यास मा.अमरावती न्यायालयाचे कार्यकक्षेतच दाद मागता येईल.

२७) या नियमामध्ये निर्माण होणारे सर्व लवाद हे न्यायीक व सलोखा कायदा (Abolition & Conciliation Act) च्या तरतुदीअंतर्गत निकाली काढले जातील व सर्व प्रकारच्या विवादाचे निराकरण मा. अमरावती न्यायालयाचे कक्षेअंतर्गत राहील.

२८) कोणत्याही सबबीवर संपूर्णत: किंवा अंशत: कोणतीही निविदा स्वीकारण्याचा. नाकारण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांनी राखून ठेवलेला आहे.

उपरोक्त अटी व शर्ती मी वाचल्या व समजावून घेतल्या आणि त्यामला बंधनकारक राहील.

दिनांक : 09/08/२०१७

अध्यक्ष
.....युवा प्रहार स्वयंरो.ना.से.सह.संस्था
(कंत्राटदाराची सही व शिक्का)

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
क्र.संगाबाअवि/१/१२३/ए -४५७/२०१९
दिनांक - २६ मार्च, २०१९

प्रति,

श्री जगदिश क. श्रीवास,
अध्यक्ष,
युवाप्रहार स्वयंरोजगार नागरीक सेवा
सहकारी संस्था मर्या,
जुनी हिंदी शाळा नं. २ चे मागे,
मधुबन चौक, मसानगंज, अमरावती.

**विषय - विद्यापीठ वाहनांकरीता कंत्राटी पध्दतीने वाहनचालकांच्या सेवा उपलब्ध करून देण्याबाबतच्या कंत्राटाला मुदतवाढ देण्याबाबत.....**

संदर्भ - विद्यापीठ कार्यादेश पत्र क्र.संगाबाअवि/१/१२३/ए-७१५/२०१७ दि. १.४.२०१७

महोदय,

उपरोक्त संदर्भाकींत कार्यादेशानुसार आपल्या संस्थेशी विद्यापीठ वाहनांकरीता कंत्राटी पध्दतीने वाहनचालकांच्या सेवा उपलब्ध करून देण्याबाबतचा दि. १.४.२०१७ ते दि. ३१.३.२०१९ या दोन वर्ष कालावधीकरीता करण्यात आलेला करार दि. ३१.३.२०१९ रोजी संपुष्टात येत आहे.

तथापी कार्यालयीन कामकाजाच्या दृष्टीने, आपल्या संस्थेस पुर्वीच्याच अटी व शर्तीच्या अधीन राहून तसेच प्रति वाहनचालक, प्रतिमाह रू. १०,८९०/- या दराप्रमाणे पुढील आदेशापर्यंत अथवा नवीन कंत्राटदार संस्थेची नियुक्ती होईपर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

प्र.कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

O/C

केन्द्रीय आवक शाखा
आवक क्र. A - 457
दिनांक 26/03/19
आवक लिपीक

**प्रतिलिपी - माहितीस्तव**

१. वित्त व लेखा अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
२. उद्यान अधिक्षक, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

5/13
27/3/19

C:/Users/Shree/Desktop/AR/Vehicle.pmd (49)